PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Maratha Tituka Melwawa
Year: 1964

Song: Marathi Paul Padate Pudhe
Lyricist: Shanta Shelke

सदा स्वधर्म हा आपुला
जरी का कठीण जाहला
तरी हाची अनुष्ठीला भला देखे
स्वंये शस्त्र देशार्थ हाती धरावे
पिटावे रिपूला रणी वा मरावे
तुझ्या रक्षणा तूच रे सिद्‍ध होई
तदा संकटी देव धावून येई
जय जय रघुवीर समर्थ
जय जय रघुवीर समर्थ
जय जय रघुवीर समर्थ
जय जय रघुवीर समर्थ
जय जय रघुवीर समर्थ
जय जय रघुवीर समर्थ
स्वराज्य तोरण
स्वराज्य तोरण चढे
गर्जती तोफांचे चौघडे
मराठी पाऊल पडते पुढे
मराठी पाऊल पडते पुढे
स्वराज्य तोरण चढे
गर्जती तोफांचे चौघडे
मराठी पाऊल पडते पुढे
मराठी पाऊल पडते पुढे

विठोबा रखुमाई
विठोबा रखुमाई
विठोबा रखुमाई
विठोबा रखुमाई

मऊ मेणाहूनि आम्ही विष्णुदास
मऊ मेणाहूनि आम्ही विष्णुदास
कठीण वज्रास भेदू ऐसे
मऊ मेणाहूनि आम्ही विष्णुदास
मऊ मेणाहूनि

कोट छातीचा अभंग त्याला
कधी न जातील तडे
मराठी पाऊल पडते पुढे
मराठी पाऊल पडते पुढे

माय भवानी प्रसन्न झाली
सोनपाऊली घरास आली
आजच दसरा आज दिवाळी
आजच दसरा आज दिवाळी
चला सयांनो अंगणी घालू
कुंकुम केशर सडे
मराठी पाऊल पडते पुढे
मराठी पाऊल पडते पुढे
मराठी पाऊल पडते पुढे
मराठी पाऊल पडते पुढे

बच्चे आम्ही वीर उद्याचे
बाळमुठीला बळ वज्राचे
वारस होऊ अभिमन्यूचे
वारस होऊ अभिमन्यूचे
दुध आईचे तेज प्रवाहे
नसातूनी सळसळे
मराठी पाऊल पडते पुढे
मराठी पाऊल पडते पुढे

PlanetRead
Literacy for a Billion

शुभघडीला शुभमुहूर्ती
सनई सांगे शकुनवंती
शुभघडीला
जय भवानी जय भवानी
जय भवानी जय भवानी
दशदिशांना घुमत वाणी
घुमत वाणी
शुभघडीला शुभमुहर्ती
सनई सांगे शकुनवंती
शुभघडीला
जयजयकारे दुमदुमवू हे सह्याद्रीचे कडे
सह्याद्रीचे कडे

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*